| MHKO170003352015 | **नियमित दिवाणी दावा क्र. ७२/२०१५**<br>श्री. शंकर श्रीपती पाटील<br>वि.<br>दत्तात्रय गणपती पाटील वगैरे |
|---|---|

## नि. १२९ खालील आदेश

१. प्रस्तुत अर्ज वादी याने प्रतिवादी क्र. १ चे वारस रेकॉर्डवर घेणेकरीता दाखल केलेला आहे.

२. प्रस्तुत अर्जास प्रतिवादी यांनी म्हणणे सादर करुन योग्य तो आदेश पारीत करणेत यावा असे कथन केले.

३. वादी तर्फे वकील यांनी असा युक्तिवाद केला की, प्रतिवादी क्र. १ हा दि. १८.१२.२०२४ रोजी मयत झालेला आहे. त्याला अर्जात कथन केल्याप्रमाणे ४ वारस आहेत. वादी याने प्रस्तुत प्रतिवादीच्या मृत्यु दाखल्याची प्रत दाखल केली आहे. वादीचा अर्ज मुदतीत आहे. अंतिमत वादीचा अर्ज मंजुर करणेत येउन प्रतिवादी क्र. १ चे वारस अभिलेखावर घेण्यात यावे अशी विनंती केली.

४. अर्ज, म्हणणे व कागदपत्रांचे अवलोकन केले असता वादी याने दावा वाटपा करीता दाखल केल्याचे दिसून येत आहे. वादीने दाखल केलेल्या मृत्यु दाखल्यावरुन प्रतिवादी क्र. १ हा दि. १८.१२.२०२४ रोजी मयत झाल्याचे दिसून येत आहे. मुळातच मुदतीच्या कायदयानुसार वादी याचा अर्ज मुदतीत आहे असे वाटते. सबब मी पुढील आदेश पारीत करत आहे.

## आदेश

**१. वादी याचा नि. १२९ वरील अर्ज खर्चासह मंजुर करणेत येत आहे.**

**२. वादी याने प्रतिवादी क्र. १ चे वारस अभिलेखावर घेउन १४ दिवसात दुरुस्ती करावी व दाव्याची दुरुस्ती प्रत तात्काळ दाखल करावी.**

**सही/-**

पन्हाळा
दि. १२.०६.२०२५

**के. दि. काकतकर**
सह. दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
पन्हाळा